महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमांतर्गत गठीत करण्यात आलेल्या माथाडी मंडळांमार्फत माथाडी कामगारांच्या वेतनातुन राष्ट्रीयकृत बँक, सहकारी बँक व पतसंस्थांकडून घेतलेल्या कर्जाच्या हप्त्याची कपात न करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. युडब्ल्युए-२०१८/प्र.क्र.७०९/कामगार-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०५ मार्च, २०१९.

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यामध्ये महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंतर्गत विविध माथाडी मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. या अधिनियमाच्या कलम २ मध्ये कंत्राटदार, मुख्य मालक, आस्थापना व कामगार यांच्या व्याख्या स्पष्ट केलेल्या आहेत. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ४ नुसार अधिनियमाच्या अंमलबजावणीकरीता मंडळांच्या योजना करण्यात आल्या असून, कलम ७ मध्ये मंडळांचे कर्तव्य व कार्य याबाबत तरतुद करण्यात आली आहे.

माथाडी अधिनियमांतर्गत तयार केलेल्या योजनांमध्ये मंडळांना लेव्ही तसेच योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या देय रकमा वसूल करण्याचा अधिकार आहे व त्यास मंडळ बांधील आहे. योजनेच्या तरतुदींमध्ये नोंदीत मुख्य मालकांवर मंडळाकडे नोंदीत झालेल्या कामगारांनी केलेल्या कामापोटी देय असलेली लेव्ही, वेतन इ. देण्याचे बंधनकारक आहे. योजनेतील तरतुदीनुसार माथाडी कामगार हे मंडळाचे नोंदीत माथाडी कामगार ठरतात परंतु ते मंडळाचे कर्मचारी ठरत नाहीत. सबब, महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ मधील “कामगार, “मालक व मुळ मालक” या व्याख्येनुसार माथाडी मंडळे ही “मालक किंवा मुळ मालक” या संज्ञेमध्ये मोडत नाहीत.

माथाडी मंडळे ही मालक या संज्ञेत येत नसल्यामुळे तसेच महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंतर्गत अस्तित्वात असलेल्या माथाडी मंडळांच्या योजनांमध्ये माथाडी कामगारांच्या वेतनातुन कर्जाची अथवा कर्जाच्या हप्त्याची कपात करण्याची कोणतीही तरतुद नसल्यामुळे अशा माथाडी मंडळांना नोंदीत माथाडी कामगारांच्या वेतनातुन सहकारी संस्था/पतपेढी/राष्ट्रीयकृत बँका अशा वित्तीय संस्थांमार्फत माथाडी कामगारांनी घेतलेल्या कर्जाची अथवा कर्जाच्या हप्त्याची कपात करुन देता येईल किंवा कसे, याबाबत शासनाच्या विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. विधी व न्याय विभागाने दिलेले अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

“As regards the deductions of loan amount all installment or of loan amount from the wages of the registered workers taken by them from Co-operative society or Nationalized Bank, the Board has no authority to deduct the installment of such a loan and pay to the Bank, as the Board is not the employer/principle employers of the registered workers under the Scheme.”

विधी व न्याय विभागाने दिलेले अभिप्राय व महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या विविध माथाडी मंडळांच्या योजनांमधील तरतुदी पाहता, नोंदीत माथाडी कामगारांच्या वेतनातुन होणाऱ्या कपातीबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ मधील "कामगार", "मालक" व "मुळ मालक" या व्याख्येनुसार माथाडी मंडळे ही "मालक" किंवा "मुळ मालक" या संज्ञेमध्ये मोडत नाहीत. तसेच उक्त अधिनियमांतर्गत विविध माथाडी मंडळांकरीता अधिनियमाची अंमलबजावणी करण्याकरीता अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये देखील नोंदीत माथाडी कामगारांनी सहकारी संस्था/पतपेढी किंवा राष्ट्रीयकृत बँका यांच्याकडून घेतलेल्या कर्जापोटी कर्जाची रक्कम किंवा कर्जाचा हप्ता इ.ची कपात करण्याची तरतुद नसल्यामुळे यापुढे नोंदीत माथाडी कामगारांनी सहकारी पतपेढी, सहकारी संस्था अथवा सहकारी बँका व राष्ट्रीयकृत बँकामधून घेतलेल्या कर्जाची अथवा कर्जाच्या हप्त्याची माथाडी कामगारांच्या वेतनातुन माथाडी मंडळांमार्फत कपात करण्यात येऊ नये.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१९०३०५१७५५०३२९१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dr.Shrikant L. Pulkundwar

Digitally signed by Dr.Shrikant L. Pulkundwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, serialNumber=c10a1e6c8fbe08c1180978bd3ed8a151ed05202d522b09b9960341c2f080906d, cn=Dr.Shrikant L. Pulkundwar
Date: 2019.03.05 17:57:15 +05'30'

(डॉ.श्रीकांत ल. पुलकुंडवार)
शासनाचे उप सचिव

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (पत्राने)
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, अ-६, मंत्रालय समोर,नरिमन पॉईट, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
८. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई,
१०. कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई,
११. सर्व सह/ उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई

१२. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,

१३. अध्यक्ष, सर्व माथाडी/सुरक्षा रक्षक मंडळे,

१४. सर्व अवर सचिव /कार्यासन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई,

१५. निवड नस्ती (कामगार-५).